# नियमित दिवाणी मुकदमा नं.८६/२०१३ मधील निशाणी ३३ वरील आदेश

( CNR NO. MHRG14-000540-2013)

१. वादी याने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी केला आहे.

२. वादीचे असे कथन केले आहे की, वादी संचालक असलेली कंपनी 'गणेश इन्वेसमेंट ॲण्ड फायनान्सिअल टेक्नीक्स प्रा.लिमीटेड' चे नाव बदलण्यात आल्याने त्या मजकुरापूर्वी 'जी आय कार्पोरेट ॲडव्हाइजर्स प्रा. लि. पूर्वाश्रमीची' असा मजकूर नमूद करुन त्याप्रमाणे दावा दुरुस्ती मागितली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीने सदरचा अर्ज नावात बदल करण्याकरीता दाखल केला असून त्याबाबत कोणतीही कागदपत्रे दाखल केली नसल्याबाबत हरकत घेतली व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे व अभिलेख वाचून पाहीला. वादी व प्रतिवादी वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत –**

६. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता वादींनी मागितलेली दावा दुरुस्ती ही दाव्यातील मुददे निश्चितीच्या पूर्वीची आहे. सदर कामी अदयाप मुददे निश्चित होवून पुरावा सुरु झालेला नाही. वादीचे असे कथन आहे की, घडलेली घटना अभिलेखावर येणे दाव्याचे अंतिम निकालाकामी आवश्यक आहे. सदरचे कारण योग्य वाटते. सदर कामी दावा दुरुस्ती झाल्यास प्रतिवादीस पुन्हा जादा कैफियत देवून त्याबाबत म्हणणे मांडता येणार आहे. वादीच्या विलंबाबाबत वादीवर दंड आकारुन सदर दुरुस्ती मंजूर करता येणे शक्य आहे. सदर दावा दुरुस्ती करु न दिल्यास उभय पक्षकारांचे वादातीत मुददे निश्चित करुन त्यावर योग्य न्यायनिर्णय होणार नाही. सबब, सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे योग्य होईल.

७. सदरचा दावा दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरची दावा दुरुस्ती मंजूर होणे न्यायोचित होणार आहे. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज रु.२५०/– दंडावर मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | सदर दंडाची रक्कम वादीने प्रतिवादी यांना पुढील तारखेचे आत द्यावी. |
| ३. | वादीने दाव्यामध्ये दंडाची रक्कम भरल्यानंतर विहीत कालावधीत योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ४. | वादीने दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

WALI NILESH MALAKAPPA Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA Date: 2022.01.19 12:31:29 +0530

ठिकाण –उरण (निलेश एम.वाली )

दिनांक – १८.०१.२०२२. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.